(५०७)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/झोपुआ/ २२५ /२०२४
दिनांक : १८/०९/२०२४

## झोपडपट्टी निर्मुलन आदेश

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३(ड) सह कलम १२ अंतर्गत अंतिम आदेश)**

**प्रस्तावना -**

स.नं.६५पै, ६७पै, निगडी व ७७पै (नवीन स.नं. ५१ ब पै), ८६पै, दुर्गानगर झोपडपट्टी, आकुर्डी, निगडी येथील अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम १२ अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

(२) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(ड) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे हे सक्षम आहेत; आणि

(३) ज्याअर्थी, अनुसुचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची पूर्वसूचना प्रकरणातील सविस्तर पार्श्वभूमी नमूद करुन महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक - पुणे विभागीय पुरवणी दि. ऑगस्ट १०-१६, २०२३, पान नं.११ ते १३ राजपत्रामध्येही प्रसिध्द झालेली आहे. आणि दि.२४/०८/२०२३ रोजीच्या महाराष्ट्र निरोप्या व जन मंथन या स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करणेत आली असून सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रकारे योजनाक्षेत्रात दि.०४/०८/२०२३ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि

(४) विकसक मे.रेन्बो डेव्हलपर्स ॲण्ड प्रमोटर एल.एल.पी यांचेमार्फत मौजे निगडी येथील स.नं.६५पै, ६७पै, व मौजे आकुर्डी येथील ७७पै (नवीन स.नं. ५१ ब पै), ८६पै, (दुर्गानगर) येथील बांधकाम आयोग्य (Non Buildable) जागेवरील झोपडीधारकांचे पुनर्वसन प्राधिकरणाकडील दि.११/०९/२०१४ रोजीच्या विशेष नियमावलीतील नियम क्र.२० नुसार स.नं.५६पै, ५७ पै, ६३ पै, शरदनगर, निगडी येथील मिळकतीवरती कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यात येणार आहे

(५) ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतच्या कार्यान्वयना संदर्भात कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्यामुळे व झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसंदर्भातील परिस्थिती अस्तित्वात असल्याने सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील झोपड्या पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणेबाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ अधिनियमातील कलम ३(ड) सह कलम १२ च्या तरतुदीनुसार सदर क्षेत्र झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषीत करण्यासंदर्भातील अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश :-**

१) सदर झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र घोषीत करण्यासंदर्भातील दि.०२/०८/२०२३ रोजीच्या पूर्वसूचना आदेशामधील सर्व शर्ती-अटी लागू राहतील या निर्देशासह सदर आदेश कायम करण्यात येत आहे.

२) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीमधील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिका-यास राहतील.

३) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास / झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास / झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास अशा प्रकरणी पात्रता धारण केलेली असली तरीही असा झोपडीधारक, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

४)  सदर झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्रात कोणासही कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम करता येणार नाही व अशी बाब निदर्शनास आल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता असे बांधकाम पाडणेत येईल.

५)  सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती अपराधसिध्दीनंतर उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

६)  सदरच्या आदेशाविरोधात उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आत मा.शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचे कार्यालयात अपिल दाखल करणे शक्य आहे.

**झोपडपट्टीचे नाव :- स.नं.६५पै, ६७पै, निगडी व ७७पै (नवीन स.नं. ५१ ब पै), ८६पै, आकुर्डी, दुर्गानगर झोपडपट्टी**

**महानगरपालिकेचे नाव :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## अनुसूची

| गाव | स.नं. | जमीनीचे मालक/भोगवटादार | क्षेत्र ( चौ. मी.) पूर्णत: | चतु:सिमा | विकसकाचे नाव व शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| मौजे निगडी | ६५ (पै), ६७ (पै) | पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण | ७८०४.३६ चौ.मी. | **पुर्व** - आंबेडकरनगर झोपडपट्टी व मोकळी जागा, | मे.रेन्बो डेव्हलपर्स ॲण्ड प्रमोटर एल.एल.पी ७०१ प्राईड पर्पल आकॉर्ड बिल्डींग, बाणेर, पुणे - ४५. |
| मौजे आकुर्डी | ७७पै ( नवीन स.नं.५१ ब पै) | बजाज ऑटो कंपनी लिमिटेड | | **दक्षिणेस** - बजाज कंपनी | |
| | ८६ (पै) | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | | **पश्चिमेस** - यमुनानगर निगडी व रस्ता | |
| | | | | **उत्तरेस** - चिंचवड आकुर्डी, लिंक रोड | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
**दिनांक :** १६/०१/२०२४

(नीलेश र. गटणे), (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

16/1/24 16.01.24 सक्षम प्रा. क्र. ३

**प्रत :-**

१.  मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे, यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

२.  अ) मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
    ब) उपआयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, झोनिपु विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

३. जमिन मालक -
    अ) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, नविन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशनजवळ, आकुर्डी, पुणे-४४ - यांना माहितीस्तव सादर.
    ब) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, टेल्कोरोड, अण्णासाहेब नगर, चिंचवड, पिंपरी चिंचवड, पुणे - १९- यांना माहितीस्तव सादर.
    क) बजाज ॲटो कंपनी लिमिटेड, जुना मुंबई - पुणे हावये, मेन रोड, आकुर्डी, पुणे -३५ - यांना माहितीस्तव सादर.

४.  मे.रेन्बो डेव्हलपर्स ॲण्ड प्रमोटर एल.एल.पी, ७०१ प्राईड पर्पल आकॉर्ड बिल्डींग, बाणेर, पुणे.